# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## निदेश क्र. १४/२०२२

**विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी परीक्षा २०२२ करीता पध्दती आणि रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२२.**

**ज्याअर्थी**, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा दिनांक १ मार्च, २०१७ पासून लागू झालेला आहे.(महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ / २०१७);

**आणि**

**ज्याअर्थी**, वर नमुद असलेला अधिनियम गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली साठी लागू करण्यात आला आहे;

**आणि**

**ज्याअर्थी**, विद्यापीठाच्या उन्हाळी – २०२२ परीक्षांचे संचालन व नियोजन संदर्भात उन्हाळी – २०२२ च्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा घेण्याबाबत निर्णय घेण्याकरीता दि. २३ मे २०२२ रोजी आयोजीत विद्यापरीषदेच्या आकस्मिक सभेत विषय सादर करण्यात आलेला होता. सदर विषयावर झालेल्या निर्णयानुसार उन्हाळी – २०२२ ची परीक्षा MCQ based Offline with OMR Sheet पध्दतीने निर्णय घेण्यात आला होता;

**आणि**

**ज्याअर्थी**, सदर बाब परिनियमाद्वारे नियमित होणे आवश्यक होते;

**आणि**

**ज्याअर्थी**, परिनियम तयार करून मान्यता घेतल्या जाण्याची प्रक्रिया वेळ खाऊ स्वरूपाची होती;

**आणि**

**ज्याअर्थी**, उपरोक्त परीक्षा आकस्मिक विद्यापरीषद सभा द्वारा सुचित मार्गदर्शक सुचना व घेतलेल्या ठरावाच्या आधारावर निदेश तयार करण्याची नितांत आवश्यकता होती;


**त्याअर्थी**, मी. डॉ. प्रशान्त श्री. बोकारे, कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ, अधिनियम, २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारान्वये **निदेश क्र. १४/२०२२** म्हणून खाली नमुद असलेले निदेश निर्गमित करीत आहे.

१. या निदेशाला ''**विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांकरिता उन्हाळी परीक्षा २०२२ करीता पध्दती आणि रचना इत्यादी विषयी प्रक्रिया निर्धारित करणारा निदेश, २०२२**'' असे संबोधण्यात येईल.

२. हा निदेश ज्या तारखेला निर्गमित करण्यात येईल त्या तारखेपासून अमंलात येईल.

३. विद्यापीठातील सर्व अभ्यासक्रमांच्या या पुर्विच्या काळातील परीक्षे विषयी वेळोवेळी निर्गमित केलेले निदेश, अध्यादेश, परिनियम, परिपत्रक व आदेश इत्यादीमधील तरतुदी उन्हाळी परीक्षा २०२२ वगळून आजही लागू असतील.

४. सत्र २०२१—२२ दरम्यान प्रवेशीत नियमीत विद्यार्थ्यांची उन्हाळी — २०२२ ची परीक्षा बहुपर्यायी प्रश्न आधारीत ऑफलाईन ओ.एम.आर उत्तर पत्रिका पध्दतीने घेण्यात येईल. अशा सर्व विद्यार्थ्यांना मिळणारी श्रेणी ही सदर अभ्यासक्रमाच्या विहीत परिक्षा योजनेनुसार काढण्यात येईल. जसे उदाहरणार्थ ८० टक्के गुण विद्यापीठ मुल्यमापनावर आधारीत असेल आणि २० टक्के गुण महाविद्यालय मुल्यमापनाचे गुण लक्षात घेऊन खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे ठरविल्या जाईल व तशी गुणपत्रिका सर्व विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे वितरीत केल्या जाईल.




५. सदर परीक्षा MCQ based Offline with OMR Sheet पध्दतीने घेतल्या जातील. विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिका सोडविण्याकरीता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मिनीटांचा अवधी देण्यात येईल. तसेच दिव्यांग विद्यार्थ्यांकरीता नियमानुसार अतिरीक्त वेळ देण्यात येईल. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणांचा पेपर असेल. विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर चुक आढळल्यास त्याकरीता Negative Marking असणार नाही. प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे ओ.एम.आर उत्तर पत्रिकेमध्ये उचित पर्याया समोर निळ्या किंवा काळ्या बॉल पेनद्वारे वर्तुळ करून द्यावयाचे आहे. सदर बहुपर्यायी परीक्षेतील प्राप्त गुण संबंधीत अभ्यासक्रमाच्या परिक्षा योजनेनूसार परिवर्तीत करण्यात येतील. तसेच सदर परीक्षेअंतर्गत कुठल्याही विषयाचे पुन:मुल्यांकन होणार नाही.

६. बहुपर्यायी प्रश्न आधारीत ऑफलाईन ओ.एम.आर उत्तर पत्रिका पध्दतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेमध्ये ओ.एम.आर उत्तर पत्रिकेत कुठल्याही प्रकारची खोडतोड तसेच अतिशुभ्र शाई (Whitener ink) चा उपयोग प्रतिबंधीत आहे.

७. अंर्तगत मुल्यमापनाचे गुण हे विषयाचे निरंतर मुल्यमापना अंतर्गत विहीत विविध मुल्यांकन पध्दती, सत्रपूर्व परीक्षा व सत्रमध्य परीक्षा या आधारावर द्यावयाचे आहेत, त्यामुळे महाविद्यालयाने घेतलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिका वा निरंतर मुल्यमापनाच्या राबविलेल्या प्रक्रियेचे दस्तावेज सिलबंद लिफाफ्यामध्ये बंद करून विद्यापीठास सादर करणे बंधनकारक राहील.

८. उन्हाळी २०२२ पदवी व पदव्युत्तर अभ्सासक्रमांच्या प्रात्याक्षीक परिक्षा, आंतरीक मुल्य निर्धारण व ऑडिट कोर्स इत्यादीचे गुण संदर्भात विद्यापीठाचे सुधारीत अधिसुचना गोंवि/प.मु.मं./गोप/जा. क्र./३९४/२०२२ दि. ३०/०५/२०२२ नुसार कार्यवाही घेणे बंधनकारक राहील.

९. उपरोक्त उल्लेखीत आयोजीत करण्यात येणाऱ्या परीक्षा या विद्यापीठाच्या १०० टक्के अथवा संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत असतील. तसेच परिक्षेत्राअंतर्गत विद्यापीठाने नियोजीत केलेल्या संलग्नित महाविद्यालय परीक्षा केंद्रावरच उन्हाळी —२०२२ परीक्षा घेण्यात येतील.

१०.पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या सर्व बहिश:ल विद्यार्थ्यांच्या परीक्षा विद्यापीठाच्या प्रचलीत नियमानूसार नियमित अभ्यासक्रमाच्या परिक्षे सोबतच MCQ based Offline with OMR Sheet पध्दतीने घेण्यात येईल.

११.उन्हाळी परीक्षा २०२२ करीता आदर्श कार्यपध्दती आणि रचना विषयक नियमावली तसेच मुख्य पर्यवेक्षक व सहपर्यवेक्षक साठी आदर्श कार्यपध्दती आणि रचना विषयक नियमावली सोबत जोडलेल्या परिशिष्ट क्र. — १ नुसार बंधनकारक राहील.

१२. विद्यापीठाच्या उन्हाळी — २०२२ परीक्षा पध्दती आणि रचना इत्यादीविषयी सदर निदेशा अंतर्गत उल्लेखीत तरतुद व प्रावधान वगळता अन्य बाबतीत प्रश्नचिन्ह निर्माण झाल्यास त्याबाबचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा. कुलगुरू महोदयांना असेल व तो सर्व संबंधीतांना बंधनकारक राहील.

स्थळ: गडचिरोली
दिनांक: २.०६.२०२२

(डॉ. प्रशान्त श्री. बोकारे )
कुलगुरू

**परिशिष्ट क्र. — १**

## उन्हाळी परीक्षा २०२२ करीता आदर्श कार्यपध्दती नियमावली

१. उन्हाळी — २०२२ परीक्षेतील सर्व अभ्यासक्रमाच्या पदवी/पदव्युत्तर वर्गामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता सदर परीक्षा घेण्यात येईल.

२. सदर परीक्षा Offline OMR MCQ (बहुपर्यायी प्रश्न) पध्दतीने घेतल्या जातील. **OMR Sample sheet** विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३. सदर परीक्षा दि. १० जून २०२२ पासुन संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकाप्रमाणे घेण्यात येणार असुन सदर परीक्षा चार शिफ्ट मध्ये असेल. पहिली शिफ्ट सकाळी १०.०० ते ११.१५ वा., दुसरी शिफ्ट १२.०० ते १.१५ वा., तिसरी शिफ्ट ३.०० ते ४.१५ वा. व चौथी शिफ्ट ५.०० ते ६.१५ वाजता राहील.

४. विद्यार्थ्यांना सदर प्रश्नपत्रिका सोडविण्याकरिता संबंधीत अभ्यासक्रमाच्या वेळापत्रकानुसार एकुण ७५ मिनिट उवधी देण्यात येईल.

५. एकुण ५० बहुपर्यायी प्रश्न असतील व प्रत्येक प्रश्नाला १ गुण याप्रमाणे एकुण ५० गुणांचा पेपर असेल. चुक प्रश्नासाठी कोणतेही Negative Marking नसतील. सदर बहुपर्यायी परीक्षेतील प्राप्त गुण संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षा योजणेनुसार परीवर्तीत करण्यात येईल.

६. विद्यापीठाने नेमून दिलेल्या परीक्षा केंद्रावर जाऊन प्रवेशपत्रात नमूद दिनांक व वेळे नुसार परीक्षा देणे अनिवार्य राहिल. कोणत्याही कारणास्तव फेरपरीक्षा घेण्यात येणार नाही.

७. सदर परीक्षा विद्यापीठाच्या संबंधीत विषयाच्या १०० टक्के अभ्यासक्रमावर (Syllabus) आधारीत असेल.

८. परीक्षेनंतर विद्यापीठाद्वारे विद्यार्थ्यांना उत्तर सुची (Answer Key) पुरविल्या जाणार नाही तसेच OMR संगणकाद्वारे तपासण्यात येणार असल्यामुळे पुन:र्मूल्यांकन केले जाणार नाही.

९. विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेसंदर्भात अडचण उद्‌भवल्यास विद्यार्थ्यांने संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांशी संपर्क साधावे

१०.दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमानुसार अधिकचा वेळ देण्यात येईल.

## मुख्य पर्यवेक्षक व सहपर्यवेक्षक साठी उन्हाळी परीक्षा २०२२ करीता आदर्श कार्यपध्दती नियमावली

१. OMR Sheet संबंधीत परीक्षा केंद्रावर विद्यापीठाद्वारे परीक्षेपूर्वी पुरविण्यात येतील.

२. परीक्षेचे प्रश्नपत्रिका प्रत्येक परीक्षा केंद्रावर Secured online question paper delivery mode द्वारे पुरविण्यात येतील.

३. परीक्षेनंतर प्रत्येक OMR Sheet विषय व सेमीस्टर नुसा पॉकेटमध्ये सिल करावयात.

४. परीक्षा संपल्यानंतर तीस मिनिटांच्या आत OMR Sheet सील करावयात. सील करण्याच्या वेळेची नोंद करावी. त्यावर केंद्र प्रमूख व बाह्यपर्यवेक्षकाची (External) स्वाक्षरी घ्यावी.

५. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीची नोंद स्वाक्षरीसह घ्यावी

६. परीक्षार्थ्यांने OMR Sheet वर माहिती बरोबर भरल आहे का हे प्यर्वेक्षकाने सुनिश्चीत करूनच त्यानंतर OMR Sheet वर स्वाक्षरी करावी.

७. ऑफलाईन परीक्षा देण्यात विद्यार्थी कोणतयाही कारणाने असमर्थ ठरल्यास अश्या विद्यार्थ्यांची नव्याने परीक्षा घेण्यात येणार नाही याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात यावी.

८. परीक्षा संपल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळी सील केलेल्या उत्तरपत्रिका (OMR Sheet) नियोजीत संकलन केंद्रावर पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित परीक्षा केंद्राच्या प्राचार्यावर राहिल.